**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-** सुरेश नारायण कटारे, **वय:- ४६** वर्षे,

**व्यवसाय:-** व्यावसायीक , **रा.**संभाजी नगर.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.बी.डी.जाधव यांच्यावतीने सुरु.</u>**

**०१.** मी सन २०१६ पासून हस्ताक्षर व ठस्से तज्ञ म्हणून संभाजीनगर येथे कार्यरत आहे. मी याकरीता Handwriting Annalist and Grapho-therpist हा कोर्स सन २०१३ साली हायब्रीड पध्दतीने परदेशी संस्थेशी संलग्न राहून केला. शिवाय महाराष्ट्रातील International Forensic Science या संस्थेमधून Certified Expert in Forensic Science and Document Examination हा कोर्स पुर्ण केला आहे. या दोन्ही कोर्सचे दाखले मी मुळ स्वरुपात सोबत आणलेले आहेत. त्याच्या सत्यप्रती मी दाखल करु शकतो. आता मला दाखविलेली प्रत ही माझया Handwriting Annalist and Grapho-therpist या कोर्सची आहे, ती सत्यप्रत आहे. मुळ प्रतीप्रमाणे त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.८९</u>** देण्यात येते. आता मला दाखविलेली प्रत ही Certified Expert in Forensic Science and Document Examination या कोर्सची आहे, ती सत्यप्रत आहे. मुळ प्रतीप्रमाणे त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.९०</u>** देण्यात येते.

**०२.** दि.०८/०८/२०२५ रोजी मला या न्यायालयाचे पत्र मिळाले. त्या पत्रासोबत मला नि.क्र.१७-कैफीयत, नि.क्र.१४ - पत्ता मेमो, नि.क्र.७२- नोटीस दि.१९/०४/२०१८, नि.क्र.५२ - रशीद पावती दि.०९/०८/२०१६, नि.क्र.५८ – दि.०२/०३/२०१५ रोजीचे ठरावपत्र, नि.क्र. ६६ - रशीद पावती दि.१०/०४/२०१५, नि.क्र.६७- रशीद पावती दि.११/०६/२०१५, नि.क्र.५९–दि.०१/०४/२०१६ रोजीचे ठरावपत्र, नि.क्र.१३ – वकीलपत्र, नि.क्र.१८- शपथपत्र अशी कागदपत्रे मिळाली.

**०३.** त्यामध्ये सहयांची आणि ठश्यांची तपासणी करायची होती. त्यासाठी side by side comparison ही पध्दत वापरली जाते. ती मी

वापरली. वादग्रस्त सही आणि मान्य सही या एकमेकांशेजारी ठेवून त्याचे फोटोग्राफस घेवून त्यांची तुलना केली जाते. या सहयांना लेबलींग केले जाते, म्हणजेच प्रत्येक सहीचे निर्देशन करण्यासाठी तिला नाव दिले जाते. ती नावे ए पासून एक्स पर्यंत देण्यात आली. अंगठयाच्या ठश्यांसाठी ए ते ई अशी नावे (लेबलींग) करण्यात आली. तुलना करताना आम्ही काही साधने वापरतो. यामध्ये मोजपट्टी, कोनमापक, मायक्रोस्कोप आणि भिंग वापरले जाते.

**०४.** या साधनांच्यामार्फत तपासणी करुन आमच्याकडील निकषांप्रमाणे सहयांची पडताळणी केली. ए ते एक्स या सहया एकाच व्यक्तींने केल्या आहेत असे पडताळणीअंती माझ्या निर्दशणास आले.

**०५.** ठश्यांची तपासणी करताना super imposition करुन त्यानूसार ठश्यांच्या कडावर (ridges) खुना करण्यात आल्या. त्यानूसार ए, बी, डी, ई हे ठस्से तंतोतंज जुळत असून जागतीक निकषांनूसार आठ घटकांमध्ये साधर्म्य आढळले. सी हा ठस्सा हा स्वच्छ उमटला नसल्याने त्यावर निष्कर्ष देता आला नाही. मात्र, त्या ठश्याच्या कडांचा आणि उमटवण्याचा प्रकार पाहता प्रथमदर्शनी तो ठस्सा वरच्या ठश्यांप्रमाणे असल्याचे निदर्शणास आले. तपासणीअंती मी दिलेले निष्कर्ष प्रमाणपत्रावर नमूद केले आहेत. ते बरोबर आहेत. त्याखाली माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९१** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.डी.एल.घोगरे यांच्यावतीने सुरु.**

**०६.** माझा पहिला कोर्स दोन वर्षांचा आणि दुसरा कोर्स सहा महिन्यांचा आहे. अशा स्वरुपाचा कोर्स केल्यानंतर व्यवसाय सुरु करण्यासाठी कोणत्याही शासकीय खात्याकडे नोंदणी करण्याची आम्हाला आवश्यकता नाही. कायद्याचे असे बंधन नसल्याने तशी आवश्यकता नाही. मी म्हणतो ते खरे असे म्हणता येणार नाही, त्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. हे खरे नाही की, वैज्ञानिक मत देण्यासाठी शासनाकडे नोंदणी

करणे आवश्यक आहे. हे खरे की, माझी संस्था खाजगी आहे. माझया संस्थेची नोंदणी आहे. अक्षर हण्डरायटींग अनलीसीस असे माझ्या संस्थेचे नाव आहे व महानगरपालिका संभाजीनगर येथे नोंद आहे. संस्थेचा नोंदणी दाखला मी हजर करु शकतो. हे खरे नाही की, हस्ताक्षर तज्ञ व ठसे तज्ञ म्हणून माझे प्रशिक्षण झालेले नाही. आजअखेर मी ८०० हून जादा प्रकरणांमध्ये मी माझे मत नोंदवलेले आहे. जो कागद आमच्याकडे तपासणीसाठी पाठवला जातो, त्यातील वाद अक्षर, सही, ठसा हे आम्ही सुरुवातीला पाहतो. आता मला दाखविलेल्या नि.क्र.५२ वरील लिहून देणार शिवाजी यांची म्हणून असलेली सही आणि नि.क्र.५८ वरील लिहून देणार शिवाजी यांची म्हणून असलेली सही आणि नि.क्र.६६ वरील लिहून देणार म्हणून असलेली शिवाजी यांची सही आणि नि.क्र.५९ वर असलेली लिहून देणार म्हणून असलेली शिवाजी यांची सही या चार सहयां दाखवल्या. त्या चारही सहया एकसारख्या आहेत. त्या स्टॅम्पवर केलेल्या सहया आहेत, त्यामुळे काही सही कागदावर व काही सही स्टॅम्पवर आहे. नि.क्र.५२ वरील सही अन्य नि.क्र.५८, ६६ आणि ५९ वरील सहयांशी जुळणारी नाही, हे म्हणणे खरे नाही.

**०७.** आता मला नि.क्र.५९ वरील शिवाजी यांची म्हणून असलेली सही पुन्हा दाखवली. ती इंग्रजी सही आहे. हे खरे नाही की, त्या सहीतील एस हा एस नसून के आहे. हे खरे नाही की, त्यापुढील अद्याक्षर ए आहे. हे खरे नाही की, त्यामध्ये सुध्दा फरक आहे. मी सांगतो की, तो चव्हाण या शब्दातील सी आहे. नि.क्र.६६ या सहीपेक्षा नि.क्र.५२ वरील सही वेगळी आहे, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, नि.क्र.५२ वरील शिवाजी यांची सही ही अन्य कागदपत्रांवरील शिवाजी यांच्या असलेल्या सहयांपेक्षा वेगळी आहे. हे खरे नाही की, शिवाजी यांच्या नि.क्र.५२ वरील सहयांची ढब आणि अन्य सहयांमधील ढब यात फरक आहे. हे खरे नाही की, नि.क्र.५२ वरील सहयांचे वळण हे शिवाजी यांच्या अन्य कागदपत्रांवरील सहयांच्या वळणाशी जुळत नाही. हे खरे नाही की, नि.क्र.५२ वरील सहयांमध्ये असलेले दोन अद्याक्षरातील अंतर

आणि अन्य सहयांमध्ये असलेले शिवाजी यांच्या सहयांच्या अद्याक्षरातील अंतर भिन्न आहे. हे खरे की, नेहमीची सही सफाईदार असते. हे खरे की, अशा सहीमध्ये एकसंधपणा असतो. हे खरे की, नेहमीची सही करताना त्या सहीचा ओघ नैसर्गीक असतो. हे खरे नाही की, नि.क्र.५२ वरील शिवाजी यांच्या म्हणून असलेल्या सहया व अन्य निशाणी क्रमांकातील शिवाजी यांच्या म्हणून असलेल्या सहया यात फरक आहे. प्रत्येक सहीचे ४० ते ४५ निकष आम्ही तपासतो. हे खरे नाही की, या सहयांमध्ये मला सदरचे निकष आढळले नाहीत. मला सर्व निकष आढळून आले. हे खरे की, नि.क्र.५२ वरील अंगठा हा पुसट आहे. हे खरे की, अन्य कागदपत्रांवरील अंगठयाची शाई गडद आहे. हे खरे नाही की, नि.क्र.५२ वरील अंगठा लहान असून अन्य निशाणी क्रमांकावरील अंगठे आकाराने मोठे आहेत. हे खरे नाही की, त्यांच्या लांबी आणि रुंदीमध्ये फरक आहे. हे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी खोटे अहवाल दिले. हे खरे नाही की, नि.क्र.५२ वरील शिवाजी याची सही व अंगठा हे अन्य कागदपत्रांवरील त्याच्या सही व अंगठयाशी जुळतात असे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, असा तज्ञ अहवाल देण्यासाठी मला अधिकारीता नाही. हे खरे नाही की, मला अशा स्वरुपाचा कोणताही अनुभव नाही. हे खरे की, थेरॉटीकल आणि प्रॅक्टीकलमध्ये फरक असतो. अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर अनुभव घेणे आवश्यक असते. असा अनुभव घेतल्याबद्दल मी कागदपत्रे सादर करु शकणार नाही. हे खरे नाही की, मला कोणताही अनुभव नाही. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक २५/०२/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.